## कृषि पणन विषयक बातम्या : नोव्हेंबर 2024

Agrowon, 21/11/2024

# लासलगावहून रेल्वेने कांदा दिल्लीला रवाना


## आतापर्यंत दिल्लीसाठी ५, तर चेन्नईसाठी १ रेकचा पुरवठा

ॲग्रोवन वृत्तसेवा

नाशिक : कांद्याची उपलब्धता कमी असल्याने शहरातील किरकोळ कांदा विक्री दरात सुधारणा झाली आहे. त्यामुळे कांद्याचे दर नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारने पुन्हा एकदा भाव स्थिरीकरण निधी योजनेअंतर्गत खरेदी केलेला कांदा बाजारात सुरू आहे. त्या अनुषंगाने 'नाफेड' व 'एनसीसीएफ' या दोन संस्थांच्या माध्यमातून खरेदी केलेल्या कांद्यापैकी शनिवारी (ता. १६) रेल्वेच्या माध्यमातून ८४० टन कांदा किशनगंज नवी दिल्ली येथे पाठविण्यात आला आहे.

लासलगाव येथील नाफेड व एनसीसीएफच्या गोदामातून आतापर्यंत दिल्लीसाठी २५२० टन कांदा पाठवण्यात आला आहे. ८४० टन कांदा चेन्नई येथील कोरूकिपिट्टू येथे पाठवत कांद्याच्या वाढलेल्या भावातून दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

किरकोळ दरात कांद्याने ८० रुपये प्रति किलोचा टप्पा पार होताच गेल्या आठवड्यात साठेबाजी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाईचा इशारा दिला गेल्याने कांदादरात एक हजार रुपयाची घसरण झाल्याचे दिसले.



उन्हाळा कांद्याची आवक कमी झाल्याने काही आठवड्यात कांदा भावात तेजी पाहायला मिळाली होती. दरम्यान, लासलगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत लाल कांद्याला कमीत कमी १६०० जास्तीत जास्त ४९०० सरासरी ४५००, तर उन्हाळ कांद्याला बाजारभाव कमीत कमी २९०० जास्तीत जास्त ४९०५, तर सरासरी ४७०० भाव मिळाला. याशिवाय कांदा बिहार, उत्तर प्रदेश, ओडिशा, पश्चिम बंगाल, आसाम रस्ते मार्गाने कांदा जात आहे.

Agrowon, 19/11/2024

# देशातील केळी निर्यातीची गती कायम

## राज्यात सोलापूरची आघाडी

ॲग्रोवन वृत्तसेवा

जळगाव : केळी निर्यातीत देशातून यंदाही वाढ दिसत आहे. केळी निर्यातीत राज्यानेही चांगली कामगिरी केली असून, सोलापूरचा त्यात पहिला क्रमांक कायम आहे. एप्रिल २०२३ ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत देशातून सुमारे २५ हजार कंटेनर (एक कंटेनर २० टन क्षमता) केळीची निर्यात झाली. २०२२-२३ च्या तुलनेत ही निर्यात सुमारे साडेसात ते आठ हजार कंटेनरने वधारली आहे. केळी निर्यात कायम आहे.

इस्राईल व आखातात तणाव असल्याने निर्यातीसंबंधी अडचणी आहेत. सुएझ कालव्याऐवजी आफ्रिकेला वळसा घालून निर्यात सुरू आहे. यात निर्यातीसंबंधी भाडेवाढ झाल्याने निर्यातीच्या केळीचे दर मात्र कमी आहेत किंवा त्यात मोठी वाढ झाली नाही.

### निर्यातक्षम केळी कमी

केळी निर्यातीत महाराष्ट्र पुढे आहे. देशातील एकूण केळी निर्यातीत महाराष्ट्राचा



वाटा ६३ टक्क्यांपर्यंत आहे. या पाठोपाठ गुजरात, आंध्र प्रदेश व केरळ येथून केळी निर्यात होत आहे. देशात आता बारमाही केळी निर्यातीसाठी उपलब्ध आहे. राज्यात केळी लागवडीत जळगाव पुढे आहे. परंतु निर्यातीत सोलापूरने पहिला क्रमांक कायम ठेवला आहे. राज्यात केळी निर्यात सुरू आहे. पण गती संथ आहे. कारण निर्यातक्षम केळी कमी आहे. राज्यात सर्वाधिक निर्यात सोलापूर भागातून झाली आहे. सोलापुरात उन्हाळ्यात केळी निर्यातीसाठी उपलब्ध नव्हती. या कालावधीत खानदेशात केळी अधिकची उपलब्ध झाली. रोज १०० ट्रक (एक ट्रक १० टन क्षमता) केळी मार्च ते मे या कालावधीत खानदेशात निर्यातीसाठी उपलब्ध झाली. अजूनही खानदेशातून केळीची निर्यात सुरू आहे. रोज पाच कंटेनर केळीची निर्यात खानदेशातून आखातात केली जात आहे.

### दरात जूननंतर सुधारणा

खानदेशात एप्रिल ते जून या कालावधी केळी दर कमी होते. मार्च व एप्रिलमध्ये निर्यातक्षम केळी अधिकची काढणीवर आली. देशांतर्गत व निर्यातीसाठी मिळून खानदेशात रोज ६०० ट्रक केळी काढणीसाठी एप्रिल व मेमध्ये उपलब्ध होती. या कालावधीत केळी दर कमी झाले. किमान ४०० ते ७०० व कमाल १३०० रुपये प्रतिक्विंटलचा दर मिळाला. परंतु केळी दरात जुलैत वाढ सुरू झाली. ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये निर्यातीच्या केळीला खानदेशात किंवा उत्तर महाराष्ट्रात सरासरी २८०० रुपये प्रतिक्विंटलचा दर मिळाला. जुलैनंतर निर्यातीच्या केळीचे दर सतत वाढले. ते ऑक्टोबरच्या मध्यापर्यंत टिकून होते. सध्या देशातून महाराष्ट्र, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, तमिळनाडू येथून केळीची निर्यात सुरू आहे.

Pudhari, 18/11/2024

# सोयाबीन, कापसाच्या हमीभावात लक्षणीय वाढ; शेतकऱ्यांना दिलासा

## दोन्ही पिकांसाठी खरेदी केंद्रांची संख्या वाढविण्याचे निर्देश

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय कृषी व वस्त्रोद्योग मंत्रालयाशी केलेली सकारात्मक चर्चा आणि पाठपुराव्यानंतर, केंद्र सरकारने २०२४-२५ साठी सोयाबीन आणि कापसाचे हमीभाव जाहीर केले आहेत. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे.

त्याचबरोबर राज्यात कापूस आणि सोयाबीनच्या हमीभावाने खरेदीसाठी आवश्यक अधिकाधिक केंद्रे वाढविण्याबाबत मुख्यमंत्री शिंदे यांची केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांच्यासमवेत चर्चा झाली. यासंदर्भात केंद्रीय मंत्री गोयल यांनी सकारात्मक संकेत दिले आहेत. राज्यात कापूस लागवडीखालील क्षेत्र ४०.७३ लाख हेक्टर असून, अपेक्षित एकूण उत्पादन ४२७.६७ लाख क्विंटल म्हणजेच ४२.७७ लाख मेट्रिक टन आहे. कापसाची खरेदी कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडियामार्फत केली जाते. त्यासाठी १२१ खरेदी केंद्रे मंजूर आहेत. अतिरिक्त ३० खरेदी केंद्रांची मागणी प्रस्तावित असून, १६ नोव्हेंबर २०२४ पर्यंत ७१ केंद्रांवर ५५ हजार क्विंटल म्हणजेच ११ हजार गाठी कापसाची खरेदी करण्यात आली. कापसाचा सध्याचा सरासरी बाजारभाव ७,५०० रुपये प्रतिक्विंटल आहे.



### कापूस हमीभावातील ऐतिहासिक वाढ

- मध्यम धागा कापूस : ७,१२१ रुपये प्रतिक्विंटल
- लांब धागा कापूस : रु. ७,५२१ रुपये प्रतिक्विंटल
- मागील वर्षाच्या तुलनेत प्रतिक्विंटल वाढ ५०१ रुपये

### राज्य शासनाचे प्रथम टप्प्यातील उद्दिष्ट

- १० लाख मेट्रिक टन
- २६ जिल्ह्यांत ५३२ मंजूर खरेदी केंद्रे
- ४९४ कार्यरत खरेदी केंद्रे
- १६ नोव्हेंबर २०२४ पर्यंत २,०२,२२० शेतकरी नोंदणी
- एकूण खरेदी: १३,००० मेट्रिक टन

**सोयाबीन हमीभावात मोठी वाढ**

सोयाबीनला नवीन हमीभाव ४,८९२ रुपये प्रतिक्विंटल देण्यात आला असून, गेल्या वर्षी तो ४,६०० रुपये होता. त्यात यंदा मोठी वाढ झाल्याचे दिसून येते.

सोयाबीनच्या लागवडीखालील क्षेत्र ५०.५१ लाख हेक्टर असून, एकूण उत्पादन ७३.२७ लाख मेट्रिक टन एवढे आहे. पीएसएस अंतर्गत केंद्राची मंजुरी : १३.०८ लाख मेट्रिक टन इतकी आहे.

**मुख्यमंत्र्यांचे महत्त्वपूर्ण निर्देश**

१. दोन्ही पिकांसाठी खरेदी केंद्रांची संख्या वाढवण्याचे निर्देश

२. खरेदी प्रक्रिया सुरळीत व पारदर्शक ठेवण्याच्या सूचना

३. शेतकऱ्यांना त्वरित पैसे मिळण्याची व्यवस्था करण्याचे आदेश

४. खरेदी केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश.

### अधिकृत खरेदी संस्था

**कापूस खरेदीसाठी**

- कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (सी.सी.आय.)

**सोयाबीन खरेदीसाठी**

- नाफेड (N-FED)
- एन.सी.सी.एफ. (NCCF)
- महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई
- विदर्भ पणन महासंघ, नागपूर
- पृथाशक्ती फार्मर प्रोड्युसर कंपनी
- महाकिसान संघ फार्मर प्रोड्युसर कंपनी
- महाकिसान वृद्धी फार्मर प्रोड्युसर कंपनी

Pudhari,13/11/2024

# देशातून डाळिंबाच्या निर्यातीत वाढ

## प्रतिकूल परिस्थितीही निर्यातीसाठी शेतकऱ्यांचा पुढाकार; ७२ हजार टन निर्यात

**अभिजित डाके : ॲग्रोवन वृत्तसेवा**



सांगली : गेल्या दोन ते तीन वर्षांत देशातील डाळिंब पिकावर नैसर्गिक आपत्तीचे संकट ओढावले होते. परिणामी, डाळिंबाची उत्पादनात घट असूनही डाळिंबाची निर्यात करण्यासाठी शेतकऱ्यांनी डाळिंबाच्या बागा साधल्या. त्यामुळे प्रतिकूल परिस्थितीत जगभरातील ४५ ते ५० देशांतील बाजारपेठेत डाळिंबाची निर्यात झाली आहे. गेल्या दोन वर्षांपासून पुन्हा डाळिंब निर्यातीत वाढ होऊ लागली असल्याचे चित्र आहे. सन २०२३-२४ या वर्षात डाळिंबाची ७२ हजार ११ टन निर्यात झाली असून, सन २०२२- २३ च्या तुलनेत ९ हजार ७३२ टनांनी निर्यात वाढली आहे. निर्यात वाढीमुळे डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिसाला मिळाला आहे.

देशात डाळिंबाचे क्षेत्र सुमारे २ लाख ७६ हजार हेक्टर आहे. देशातून डाळिंबाची निर्यात मोठ्या प्रमाणात होते. महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, राजस्थान आणि आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये डाळिंबाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. पान ४ वर »

**देशातून डाळिंबाची झालेली निर्यात व उलाढाल**

| वर्ष | निर्यात (टन) | उलाढाल (कोटी) |
|---|---|---|
| सन २०२०-२१ | ६७,९७६ | ५१६ कोटी ६६ लाख |
| सन २०२१-२२ | ९९,०४३ | ६८८ कोटी ७७ लाख |
| सन २०२२-२३ | ६२,२८० | ४७० कोटी १७ लाख |
| सन २०२३-२४ | ७२,०११ | ५७२ कोटी ५१ लाख |
| (स्रोत : अपेडा) | | |

**“ डाळिंब नैसर्गिक आपत्तीच्या कचाट्यात सापडले होते. त्यामुळे निर्यातीवर परिणाम झाला होता. परंतु शेतकरी या संकटावर मात करत निर्यातीसाठी पुढे आले आहेत. ही बाब चांगली आहे. मात्र युरोपियन देशात निर्यात मंदावली आहे. युरोपसह अन्य देशात डाळिंबाची निर्यात वाढावी यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न झाल्यास निर्यात वाढीस मदत होईल.**

**– प्रभाकर चांदणे, अध्यक्ष, अखिल भारतीय डाळिंब संघ**

# देशातून डाळिंबाच्या निर्यातीत वाढ

**» पान १ वरून**

प्रामुख्याने युरोपसह अरब अमिराती, बांगलादेश, नेपाळ, नेदरलँड, सौदी अरेबिया, श्रीलंका आणि थायलंड या देशांत भारतातून डाळिंब निर्यात होते. २०२१-२२ मध्ये भारतातून ९९ हजार ०४३ टन डाळिंबाची निर्यात झाली होती. २०२०-२१ च्या तुलनेत २०२१-२२ मध्ये ३१ हजार टनाने निर्यातीत वाढ झाली होती. त्यामुळे देशातून डाळिंबाची निर्यात वाढीचा आलेख वाढत चालला होता.

मात्र गेल्या तीन वर्षांपूर्वी देशभरातील डाळिंबावर पिनहोल बोरर, शॉट होल बोरर या रोगाचा प्रादुर्भाव झाला होता. त्यातच नैसर्गिक संकटामुळे तेलकट, मर सारख्या रोगांचाही फटका डाळिंबाला बसला होता. पिनहोल बोरर, शॉट होल बोरर या रोगामुळे डाळिंबाच्या बागा काढण्याशिवाय शेतकऱ्यांपुढे दुसरा पर्याय नव्हता. यासाऱ्या परिणाम निर्यातीवर झाला. त्यामुळे २०२२-२३ या वर्षात डाळिंबाची निर्यात रोडावली होती. २०२२-२३ या वर्षात डाळिंबाची ६२ हजार २८० टनांची निर्यात झाली होती. २१-२२ च्या तुलनेत २२-२३ या वर्षात ३६ हजार ७६३ टनांनी निर्यात घटली होती.

वास्तविक पाहता, नैसर्गिक संकट, आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी होण्यासाठी सतत फवारण्या कराव्या लागल्या. त्यामुळे रेसिड्यू फ्री डाळिंबाचे उत्पादन शक्य झाले नाही. परिणामी, युरोपियन देशातही निर्यात किंचित वाढली आहे. युरोपसह अरब अमिराती, बांगलादेश, नेपाळ, नेदरलँड, सौदी अरेबिया, श्रीलंका आणि थायलंड यांसह सुमारे ४५ देशात डाळिंबाची निर्यात होत आहे. गेल्या वर्षभरापासून या देशातील बाजारपेठांमधून पुन्हा डाळिंबाची मागणी हळूहळू वाढू लागली आहे. त्यामुळे प्रतिकूल परिस्थितीतही देशातून डाळिंबाची निर्यात करण्यासाठी शेतकरी रेसिड्यू फ्री डाळिंबाचे उत्पादन घेण्यासाठी पुढे येऊ लागले आहेत. गेल्या वर्षापासून देशातून डाळिंबाची निर्यात वाढली असून बांगलादेश आणि अरब अमिराती या देशांकडेही डाळिंबाची निर्यातीचा कल वाढला आहे.

Agrowon, 11/11/2024

# आंबा निर्यातवाढीचे आव्हान कायम

## निर्यातक्षम बागांची नोंदणी सुरू; उत्पादन पोहोचले दोन कोटी टनांच्या पुढे

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : एक हजार ३०० प्रकारचे वाण, दोन कोटी टनांहून अधिक वार्षिक उत्पादन, तरीदेखील निर्यात तीन हजार टनांपर्यंत, अशी स्थिती भारतीय फळांचा राजा असलेल्या आंब्याची आहे. राज्यात निर्यातक्षम आंब्याची नोंदणी चालू झाली असली, तरी निर्यातवाढीचे आव्हान अद्यापही कायम आहे.

**“ केसर व हापूस या दोन्ही आंबा वाणांमध्ये जगाची बाजारपेठ काबीज करण्याची क्षमता आहे. निर्यातवाढीसाठी फलोत्पादन विभागाने पाठपुरावा करीत मँगोनेटमधील निर्यातक्षम बागांची नोंदणी सहा हजारांच्या आसपास नेली आहे.**

**– डॉ. कैलास मोते,**
कृषी संचालक, फलोत्पादन विभाग



‘अपेडा’ने केलेल्या सर्वेक्षणानुसार २०२२ मधील देशाचे आंबा उत्पादन दोन कोटी टनांच्या पुढे पोहोचले आहे. **पान ४ वर »**

# आंबा निर्यातवाढीचे आव्हान कायम

**» पान १ वरून**

यात सर्वाधिक वाटा उत्तर प्रदेश व आंध्र प्रदेशाचा आहे. देशाच्या एकूण आंबा उत्पादनापैकी २४ टक्के उत्पादन एकट्या उत्तर प्रदेशात (४८ लाख टन), तर २३ टक्के उत्पादन आंध्र प्रदेशात (२६ लाख टन) होते. त्यापाठोपाठ कर्नाटक (१७ लाख टन), बिहार (१५ लाख टन) तेलंगण (११ लाख टन) या तीन राज्यांचा समावेश होतो. उत्पादनाच्या तुलनेत देशभरातून होणारी निर्यात नगण्य आहे. गेल्या हंगामात सर्व राज्यांमधून ३२ हजार टनांच्या पुढे निर्यात झाली. त्याचे निर्यात मूल्य ५०० कोटी रुपयांच्या आसपास होते, असे अपेडाच्या सूत्रांचे म्हणणे आहे.

पणन विभागाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले, की राज्यातून आंबा निर्यात वाढीसाठी सर्वाधिक प्रयत्न पणन मंडळाने केले आहेत. पणन मंडळाने केलेल्या पाठपुराव्यामुळे राज्यात हापूस आणि केसर आंबा उत्पादन क्षेत्रात निर्यात सुविधा केंद्रे उभी करण्यात आली आहेत. त्यामुळे अपेडाच्या मदतीने निर्यात शक्य झाली असून, निर्यात सातत्याने वाढते आहे. अर्थात, देशातील आंबा उत्पादनाच्या तुलनेत निर्यात नगण्य आहे. त्यासाठी आंबा निर्यात धोरण आंबा उत्पादनातील सर्व घटक, अपेडा व विविध राज्यांची यंत्रणा यांना एकत्रित काम करावे लागेल. त्या दिशेने सध्या कोणतेही प्रयत्न होत असल्याचे दिसत नाही

राज्यात साडेचार लाख टनांच्या आसपास आंबा उत्पादन होते. उत्तर प्रदेश व आंध्रमधील उत्पादनासमोर महाराष्ट्राचा वाटा किरकोळ असला, तरी हापूस व केसर अशा दोन उत्कृष्ट जातींमुळे निर्यातीत राज्य आघाडीवर राहू शकते. परंतु राज्यात देखील एकत्रित प्रयत्न होत नसल्याचे आंबा उत्पादकांना वाटते. कोकण हापूस आंबा उत्पादक संघाच्या एका पदाधिकाऱ्याने सांगितले, की निर्यातवाढीसाठी कृषी विद्यापीठांसह अपेडा, कृषी विभाग, पणन मंडळ, उत्पादक आणि निर्यात अशा सर्व घटकांना एकत्र यावे लागेल. निर्यातीसाठी धोरण, सुकाणू समिती, बाजारपेठांच्या शोधांसाठी अभ्यासकांचा अभ्यास गट, खरेदीदार-विक्रेता व्यासपीठ निर्मिती असे उपाय करावे लागतील.

दरम्यान, राज्याच्या फलोत्पादन विभागाने निर्यातवाढीसाठी मॅगोनेट प्रणालीवर अधिकाधिक बागांची नोंदणी होण्यासाठी यंदादेखील प्रयत्न सुरू ठेवले आहेत. गेल्या वर्षी शेतकऱ्यांनी सहा हजारांच्या आसपास निर्यातक्षम बागांची नोंदणी केली होती. २०२४-२५ मधील हंगामासाठी नोंदणीची मुदत ३१ जानेवारीपर्यंत असेल, असे फलोत्पादन विभागातून सांगण्यात आले.

Agrowon, 10/11/2024

# बांगलादेशकडून कांदा आयात शुल्क शून्यावर

ॲग्रोवन वृत्तसेवा

नाशिक : बांगलादेश हा भारतीय कांद्याचा प्रमुख आयातदार देश आहे. मात्र बांगलादेशातील उत्पादित कांद्याची देशांतर्गतच निकासी व्हावी व कांदा आयातीला निर्बंध यावेत, यासाठी बांगलादेश सरकारने हा निर्णय घेतला होता. मात्र आता कांद्याची उपलब्धता कमी असल्याने व दर नियंत्रणासाठी बांगलादेशच्या राष्ट्रीय महसूल मंडळाने कांद्याच्या आयातीवरील शुल्क हटवले आहे. १५ जानेवारीपर्यंत हा निर्णय कायम असणार आहे.

बांगलादेशकडून मागील काही महिन्यांपासून आयात शुल्क लागू करण्यात आले होते. परिणामी, भारतीय कांद्याला अपेक्षित परतावा मिळत नव्हता. केंद्र सरकारने सप्टेंबर महिन्यात किमान निर्यात मूल्य रद्द करून निर्यात शुल्क २० टक्के कमी केले होते. मात्र बांगलादेशमध्ये आयात शुल्क असल्याने त्याचा फटका बसत होता. आता बांगलादेशच्या राष्ट्रीय महसूल मंडळाने (NBR) कांद्याच्या आयातीवरील सीमाशुल्क आणि नियामक शुल्क पूर्णपणे मागे घेतले आहे. बांगलादेशच्या राष्ट्रीय महसूल मंडळाचे अध्यक्ष महंमद अब्दूल



रहेमान खान यांच्या स्वाक्षरीने ही अधिसूचना काढण्यात आली आहे. त्यानुसार १५ जानेवारी २०२५ पर्यंत हे आयात शुल्क मागे घेण्यात आले आहे. बांगलादेश सरकारच्या व्यापार व शुल्क आयोगाने कांद्याच्या दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी सध्याच्या पाच टक्के सीमाशुल्क पूर्णपणे मागे घेण्याचा प्रस्ताव ३१ ऑक्टोबर रोजी दिला होता. त्यासंदर्भात हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आता भारतातून कांद्याची निर्यात काय अंशी वाढण्याची शक्यता आहे.

सध्या भारतीय बाजारपेठेत मागणीच्या तुलनेत कांद्याची आवक कमी आहे. त्यामुळे गेल्या महिन्यापासून दरात टप्प्याटप्प्याने सुधारणा दिसून आली. आता निर्यात प्रक्रियेत देशांतर्गत व निर्यातीचे दर यातील व्यवहार जुळणार नसल्याची स्थिती असल्याचे कांदा निर्यातदार मनोज जैन यांनी सांगितले. जर आगामी काळात हा निर्णय कायम राहिल्यास कांदा उत्पादक शेतकरी व निर्यातदारांना फायदा होईल. त्यामुळे बांगलादेशमध्ये होणारा कांद्याचा पुरवठा थोड्याफार प्रमाणात वाढू शकतो असे बोलले जात आहे.

Agrowon, 08/11/2024

# जुन्नर, आंबेगावमध्ये केळी क्लस्टरची स्थापना

संदीप नवले, ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : जिल्ह्यातील जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यांत केळीच्या क्षेत्रात मागील काही महिन्यांपासून वाढ होत आहे. त्यामुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांची एकत्रित मूल्यसाखळी तयार करण्यासाठी जुन्नर तालुक्यातील काळवाडी येथील डेक्कन व्हॅली फार्मर्स प्रोड्युसर कंपनीच्या माध्यमातून या तालुक्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी केळी क्लस्टरची स्थापना दिवाळीच्या पार्श्वभूमीवर एक नोव्हेंबर रोजी करण्यात आली. त्यामुळे शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ, माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

केळी पिकासाठी एकत्रित मूल्यसाखळी तयार करण्यासाठी या भागात 'ॲग्रोवन'च्या माध्यमातून क्लस्टरची स्थापना करण्यासाठी विविध उपक्रम मागील काही वर्षांत हाती घेण्यात आले होते. त्याचा आधार घेऊन डेक्कन व्हॅली या कंपनीचे चेअरमन अजय बेल्हेकर यांनी क्लस्टर करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यासाठी अभिनव कृषी फार्मर्स प्रोड्यूसर कंपनीचे चेअरमन मंगेश भास्कर, शाश्वत फार्मिंग फाउंडेशनचे सदस्य शिवाजी कांबळे, सदस्य सुनील वामन, योगेश वाळुंज, शेतकरी प्रतिनिधी विनायक मुळे असे विविध शेतकरी सहकार्य करत आहे.



शेतकऱ्याला स्वाभिमानाने आणि सन्मानाने स्वतःच्या पायावर उभा करणारा, समृद्धीच्या वाटेवर नेणारा आधुनिक जगाशी जोडणारा असा हा उपक्रम आहे. यामध्ये कृषी विभाग, आत्मा व नारायणगाव कृषी विज्ञान केंद्रातील तज्ज्ञ तांत्रिक बाबींबाबत मार्गदर्शन करणार आहेत. दोन्ही तालुक्यांतील निर्यातक्षम एक हजार एकर क्षेत्र लागवडीखाली आणले जाणार आहे. त्यासाठी बाजार मागणीनुसार केळी पीक लागवडीचे वेळापत्रक तयार केले जाणार आहे. शेतकऱ्यांना शिवार फेरी, शेतीशाळा, प्रशिक्षण, अभ्यासदौरा व छापील साहित्य यांच्या माध्यमातून गुड ॲग्रिकल्चर प्रॅक्टिसेस बाबतीत सल्ला व मार्गदर्शन केले जाणार आहे. याशिवाय शेतकरी कंपनीच्या माध्यमातून योग्य प्रकारची निविष्ठा, उत्पादने, सेवा, वित्तसेवा, मान्यताप्राप्त दर्जा, प्रतवारी, पिकवण स्थिती याबाबतच्या निकषांची पूर्तता करण्यासाठी पीक काढणी व प्रतवारी दरम्यान सल्ला व मार्गदर्शन यांची मदत केली जाणार आहे.

जिल्ह्यातील केळी उत्पादकांसाठी राबवला जाणारा पहिलाच प्रयोग असून केळी पिकाचा संपूर्ण आराखडा बनविला जाणार आहे. बाजार मागणीनुसार केळी क्लस्टर आणि गावपातळीवर केळी लागवड क्षेत्र निश्चित करून वर्षभर शेतीमाल पुरवठ्याचे नियोजन कंपनीमार्फत केले आहे.

डेक्कन व्हॅली या कंपनीचे चेअरमन अजय बेल्हेकर याबाबत बोलताना म्हणाले, की फळपिकामध्ये राज्यभर त्या त्या विभागनिहाय क्लस्टर स्थापन करण्यात आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने डाळिंब, द्राक्षे, हळद अशा विविध पीकनिहाय क्लस्टर तयार केले गेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना अर्थपूर्ण फायदा होत असल्याचे दिसून येत आहे. त्याचाच आधार घेत पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव भागांत नाशिकमधील सह्याद्री फार्मच्या माध्यमातून केळी पिकांसाठी क्लस्टर तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या क्लस्टरचा फायदा अनेक शेतकऱ्यांना होणार असून इन्क्युबेशनसारख्या विविध सुविधा केळी उत्पादकांसाठी दिल्या जाणार आहे. त्यामुळे ग्राहकांना चांगला दर्जात्मक माल मिळण्यास मदत होणार आहे.

Agowon, 05/11/2024

# कडधान्य उत्पादनासाठी सरकारची 'करार शेती'

## शेतकऱ्यांसमवेत करार; हमीभावाने होणार खरेदी

ॲग्रोवन वृत्तसेवा

**पुणे : देशातील घटते कडधान्य उत्पादन वाढविण्यासाठी आणि वाढती आयात कमी करण्यासाठी सरकार पहिल्यांदाच थेट शेतकऱ्यांसमवेत 'करार शेती' करत आहे. सरकारने तमिळनाडू, बिहार, झारखंड आणि गुजरातमध्ये तूर आणि मसुराची १ हजार ५०० हेक्टरवर लागवडीसाठी करार केले आहेत.**

देशात कडधान्याची मागणी वर्षागणिक वाढत आहे. पण दुसरीकडे कडधान्याचे उत्पादन घटत आहे. मागणी आणि पुरवठ्यात तफावत येत असल्याने दरावरही परिणाम होत आहे. २०२२ च्या आर्थिक वर्षात देशातील कडधान्य उत्पादन २७३ लाख टन होते. त्यानंतर २०२३ मध्ये उत्पादन कमी होऊन २६० लाख टनांवर स्थिरावले. २०२४ च्या आर्थिक वर्षात तर दुष्काळी स्थिती असल्याने उत्पादन २४५ लाख टनांपर्यंत कमी झाले.

एकीकडे उत्पादन घटत असताना भाव वाढले म्हणून सरकार कडधान्याच्या दरावर नियंत्रण ठेवत आहे. शेतकऱ्यांचा माल बाजारात येतो त्या वेळी भाव हमीभावाच्या खाली जातात.

पान ४ वर »

### चार राज्यांत करार शेतीचा प्रयोग

देशात कडधान्य उत्पादन वाढविण्यासाठी ज्या राज्यांमध्ये कडधान्याचे उत्पादन होत नाही, त्या राज्यातील शेतकऱ्यांना लागवडीसाठी प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला. तमिळनाडू,



बिहार, झारखंड आणि गुजरात या राज्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर करार शेती केली जात आहे. शेतकरी आणि नॅशनल को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन, अर्थात एनसीसीएफ यांच्यात करार झाला. या करारानुसार शेतकरी तूर आणि मसुराचे उत्पादन घेतील. एनसीसीएफ त्यांच्या उत्पादनाचा काही भाग हमीभाव किंवा बाजारभाव यापैकी जो जास्त असेल त्या भावाने खरेदी करेल.

कडधान्य उत्पादनासाठी सरकारची 'करार शेती'

» पान १ वरून

माल एकदा शेतकऱ्यांच्या हातून गेला की मोठी तेजी येते. मागील वर्षात वाढलेल्या दराच्या स्थितीत हा अनुभव आला. म्हणजेच देशात तुटवडा निर्माण होऊन भाववाढ होते त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत नाही. त्यामुळे उत्पादन कमी होत आहे.

करार शेतीतून कडधान्य खरेदीचे प्रमाण बफर स्टॉकमध्ये यंदा जास्त नसेल. पण पुढील काही वर्षांत करार शेतीखाली जास्त क्षेत्र आल्यानंतर ही खरेदी वाढेल, असे 'एनसीसीएफ'च्या (नॅशनल को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन) अधिकाऱ्यांनी सांगितल्याचे 'इकॉनॉमिक टाइम्स'ने नमूद केले आहे.

**आत्मनिर्भरतेची घोषणा**

देशात उत्पादन कमी होत असल्यामुळे आयात वाढत आहे. २०२४ च्या आर्थिक वर्षात ४७ लाख टन कडधान्याची आयात झाली. जगातील सर्वांत मोठ्या कडधान्य वापर करणाऱ्या भारताची आयात वाढल्याचा परिणाम आंतरराष्ट्रीय बाजारात दरावरही होतो. त्यामुळे महाग आयात करावी लागते. त्यामुळे सरकारने कडधान्यामध्ये आत्मनिर्भर होण्याची घोषणा केली. त्यासाठी शेतकऱ्यांना कडधान्य उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन दिले जात आहे.